# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 2262 0601, 2269 0602, 2264 1150/51, फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक:२अ/एडीएम/२०१५/१४४६
दिनांक : 15 OCT 2015

प्रति,
कुलसचिव,

मुंबई विद्यापीठ, मुंबई/एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई/डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणरे/ पुणे विद्यापीठ, पुणे/ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर/ डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद/ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव/ स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा, विद्यापीठ, नांदेड/संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती/ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागूपर विद्यापीठ, नागपूर/ सोलापूर विद्यापीठ, सोलापूर/गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेशित असलेल्या व जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या उमेदवारांच्या निकालाबाबत.......

महोदय,

वरील विषयानुषंगाने कळविण्यात येते की, संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेनंतर प्रवेशित उमेदवारांच्या गुणवत्ता यादया विभागीय कार्यालयांमार्फत पडताळणी करण्यात येतात त्यावेळी गुणवत्ता यादी पडताळणीमध्ये काही मागासवर्गीय उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याच्या त्रुटी आढळून येतात . गुणवत्ता यादया पडताळणी केल्यानंतर त्यामध्ये आढळून आलेल्या त्रुटी प्रवेश नियंत्रण समिती आणि संबंधित विद्यापीठांना पत्राद्वारे कळविण्यात येते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे जात वैधता नसल्यास प्रवेश घेतल्यानंतर ३ महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्राच्या आधारे (Proforma H) प्रवेश करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या मागासवर्गीय उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही अशा उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ३०.११.२०१४ पर्यंत प्रवेश घेतलेल्या संस्थेत जमा करणे अपेक्षित होते.

संस्थेच्या गुणवत्ता यादीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींपैकी जात वैधतेच्या त्रुटीबाबत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती यांनी त्यांच्या दिनांक १८.६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अशा प्रकारे जात वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांच्या त्रुटयांबाबत विद्यापीठाने कोणत्या प्रकारची कार्यवाही अपेक्षित आहे याची विचारणा करून विद्यापीठ स्तरावर अशा त्रुटींतील विद्यार्थ्यांचे निकाल रोखण्यात येतात. तरी अशा त्रुटी असलेल्या उमेदवारांचे निकाल रोखण्यात यावेत किंवा जाहीर करावेत याबाबत स्पष्ट निर्देश देण्याबाबत संचालनालयास कळविले आहे.

शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी -१०/२०१३/प्र क्र ३५/ मावक, दिनांक १५ जुलै,२०१४ रोजी मराठा आरक्षणाबाबत आणि शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक अविवि २०१४/प्र.क्र.८१/तासा, दिनांक १९ जुलै,२०१४ रोजी मुस्लिम आरक्षणाबाबत आदेश निर्गमित झालेले होते. त्यांनुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये व्यावसायिक

शिक्षण

D:\Budage\२०१४-१५\Gen Correspondence\Notice of cancell admission for non submission of validity.docx

सहसंचालक तंत्र शिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, अमरावती.
क्रमांक ५८२० दिनांक १६/१०/१५

अभ्यासक्रमांमध्ये सदर प्रवर्गातील प्रवेश करण्यात आले होते. मात्र या प्रवर्गात प्रवेश घेतलेल्या काही उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे अशा उमेदवारांबाबत काय कार्यवाही करावी याबाबतही काही विद्यापीठांकडून विचारणा होत आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित उमेदवारांबाबत एकच धोरण असावे या दृष्टीकोनातून कळविण्यात येते की, शासनाच्या धोरणानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा-या मागासवर्गीय उमेदवारांपैकी ज्यांचेकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही अशा उमेदवारांना प्रवेशानंतर ३ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्र घेऊन त्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आले होते. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१५/प्र क्र ४३/तांशि-४, दि. १६.२.२०१५ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०१३/ प्र क्र ३५४/ भाग-२/ २०१३/१६-ब, दि. २१.२.२०१५ मधील सूचना विचारात घेऊन व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेशित झालेल्या मागास विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र व नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. शासन निर्णय दिनांक २१.२.२०१५ मधील परिच्छेद 'इ' मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी जात प्रमाणपत्र,नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र संबंधित सक्षम प्राधिकरणांकडून प्राप्त करून घेणे आवश्यक असल्याने त्यांनी त्यानुसार कार्यवाही करून ती प्रमाणपत्रे त्यांनी प्रवेश घेतलेल्या संस्थेच्या प्राचार्यामार्फत विभागीय कार्यालयास / संचालनालयास त्यांच्या प्रवेशाबाबत पुढे निर्णय घेण्यासाठी अतिशीघ्र सादर करणे बंधनकारक आहे याची जाणीव त्यांना करून दयावी. त्यांनी उपरोक्त आवश्यक प्रमाणपत्र सादर न केल्यास याबाबत होणा-या परिणामांची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल याची स्पष्ट जाणीव संबंधित विद्यार्थ्यांना करून देण्यात यावी. तसेच परिच्छेद 'क' मध्ये नमूद केल्यानुसार दिनांक १४.११.२०१४ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशापूर्वी ,शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबाधित राहतील असे निर्देश देण्यात आलेले असल्याने तुर्तात या संवर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले जाणार नाहीत व सदर विद्यार्थी परीक्षेस बसण्यापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी असे संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१५/६६१, दिनांक ५.५.२०१५ अन्वये या संचालनालयाच्या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांमार्फत सर्व संस्थांना कळविण्यात आलेले आहे.

जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या मुदतीबाबत संचालनालयाकडून शासनाशी पत्रव्यवहार करण्यात येणार असून या प्रकरणी शासनाकडून आदेश प्राप्त झाल्यास त्यानुसार सर्व विद्यापीठांना अवगत करण्यात येईल. तोपर्यंत अशा विद्यार्थ्यांचे निकाल रोखून ठेवण्यात येऊ नयेत,ही विनंती.

आपला,

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत माहितीसाठी

---

क्रमांक:-विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१५/ 2659
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 23 OCT 2015

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**१) प्राचार्य, सर्व विना-अनुदानित पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था यांना कळविण्यात येते की वरील पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.